सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून लागू करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व**
**विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,**
**शासन निर्णय क्र. सीबीसी-२०१९/प्र.क्र.१०८/मावक**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ११ जुलै, २०१९.**

वाचा :- १) सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.६२ , दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८.
२) सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.०७ , दिनांक ३ जुलै, २०१९.
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.२६४/आस्था-१, दिनांक २५ जून, २०१९.

**प्रस्तावना:**

वाचा क्र. १ येथे नमूद दि. ३० नोव्हेंबर २०१८ रोजीच्या अधिनियमाद्वारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग नव्याने घोषित करण्यात आला असून त्यामध्ये मराठा समाजाचा समावेश करण्यात आला आहे.

वाचा क्र.२ येथे नमूद सन २०१९ चा अधिनियम क्र. ७ दि. ३ जुलै, २०१९ अन्वये वाचा क्र. १ येथे नमूद अधिनियमातील कलम ४ क येथे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी विनिर्दिष्ट आरक्षण १२ % तर कलम ४ ख येथे विनिर्दिष्ट आरक्षण १३ % एवढे विहित करण्यात आले आहे.

वाचा क्र. ३ येथे नमूद सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. २५ जुन २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठा आरक्षण तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्ग कल्याण हे विषय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागास हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

मा. मंत्री महसुल तथा अध्यक्ष मंत्रिमंडळ उपसमिती यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना लागू करणेबाबत दि. २६.६.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता विधानभवन, मुंबई येथे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सदर योजना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या

मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तद्नुषंगाने खालीलप्रमाणे शासननिर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना लागू करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या दि. २५.६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठा आरक्षण व SEBC प्रवर्ग कल्याण हा विषय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडे सोपविण्यात आलेला आहे. SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) लागू करण्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्यास (उदाहरणार्थ मा. मंत्रीमंडळाची मान्यता/लेखाशिर्ष/शासन निर्णय/अर्थसंकल्प तरतूद उपलब्ध करुन घेणे इ.) किमान ६ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. ही बाब तसेच विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडील अपुरे मनुष्यबळ, आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने लागू होणाऱ्या आदर्श आचारसंहितेमुळे विभागाकडे उपलब्ध होणारा अल्प कालावधी विचारात घेऊन SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांसाठी SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दयावयाचा पहिला हप्ता संबंधित प्रशासकीय विभागानी सदर दोन्ही योजनांसाठी कार्यान्वित लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या वित्तीय तरतुदीतून अदा करावा.

३. उक्त नमूद दोन्ही योजनांसाठी SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दयावयाचा दुसरा हप्ता अदा करण्याच्या कालावधीपर्यंत विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाची याबाबत आवश्यकती प्रशासकीय कार्यवाही पुर्ण झाली तरच शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता देण्याची कार्यवाही विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत करण्यात येईल.

४. त्याचप्रमाणे सदर दोन्ही योजनांचा लाभ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यासाठी आजमितीस जी यंत्रणा व कार्यपध्दती, शासननिर्णय, पात्रतेच्या अटी शर्ती अस्तित्वात आहे त्यात कोणताही बदल न करता प्रचलित यंत्रणा व कार्यपध्दतीद्वारे राज्यातील सामाजिक व आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांचा लाभ संबंधित प्रशासकीय विभागाकडून देण्यात यावा.

५. महाडिबीटी पोर्टलवर राज्यातील सामाजिक व आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांचा लाभ संबंधित प्रशासकीय विभागाकडून देण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही देखील उच्च प्राधान्याने करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्याचा संगणक साकेतांक क्रमांक २०१९०७१११२१६५००१२२ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Vithalrao Weladi

Digitally signed by Vijay Vithalrao Weladi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4c33d11360090dc60a00f603b2d1b16bd83f0256338774a947f737fede7af039, serialNumber=1e395c154c970776fc5115641f8d6663d6a765cfcf30c8d1f594706468740b6d, cn=Vijay Vithalrao Weladi
Date: 2019.07.11 13:24:10 +05'30'

(वि.वि.वेलादी)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मंत्री/मा. राज्यमंत्री, (सर्व) मंत्रालय, मुंबई.मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव (कृषी), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
११.प्रधान सचिव (पशु संवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय) विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि), मंत्रालय, मुंबई.
१४.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१६.महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई

१७.महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
१८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१९.मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई
२०.संचालक, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि), मंत्रालय, मुंबई.
२१.सर्व विभागीय आयुक्त
२२.सर्व जिल्हाधिकारी

आपण सदर योजना सर्व संबंधित विभागांकडून काटेकोरपणे राबविल्या जाईल यासाठी आवश्यकती कार्यवाही करावी.

२३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)
२४.समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)
२५.अध्यक्ष/सदस्य सचिव, जिल्हा जातपडताळणी समिती (सर्व)
२६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२७.सर्व उपविभागीय अधिकारी (महसुल) तथा उपविभागीय दंडाधिकारी
२८. सर्व तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी
२९.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई
३०.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा , मुंबई
३१.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, खंडपीठ- नागपूर
३२.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा, खंडपीठ- नागपूर
३३.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, खंडपीठ- औरंगाबाद
३४.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा, खंडपीठ- औरंगाबाद
३५. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३६. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३७. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३८. संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३९.संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
४०.सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे
४१.व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे
४२.मंत्री, (महसूल), महसूल व वन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४३.मा.मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई